मुख्य कार्यालय विरार
विरार (पु)
ता. वसई, जि. पालघर – 401305

दूरध्वनी : 0250-2525101/02/03/04/05/06
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. वविशम/आस्था/७५४८/2022
दिनांक २८/११/२०२२

# जाहिर सुचना

वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय विरार येथे स्थानिक संस्था कर विभागामध्ये स्थानिक संस्था कर व कर निर्धारक व कर संकलक या पदासाठी दि. १७/१२/२०१६ चे शासन निर्णयानुसार शासकीय/निमशासकीय सेवा निवृत्त विक्री कर अधिका-यांच्या सेवा करार पद्धतीने ३ महिने अथवा जास्तीत जास्त ६ महिने कालावधीकरीता मानधन तत्वावर खालील नमूद विवक्षित कामाकरीता करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत.

**विभागाची आवश्यकता :-**

१. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील वाणिज्य आस्थापनांची फाईल तपासणे.
२. वाणिज्य आस्थापनांना स्थानिक संस्था कराच्या अनुषंगाने कागदपत्रांची पुर्तता करणेकामी नोटीस काढणे.
३. प्राप्त फाईल्सच्या अनुषंगाने सुनावणी घेणे.
४. कर निर्धारण आदेश तयार करुन स्थानिक संस्था कर विभागास सादर करणे व इतर सर्व स्थानिक संस्था कर निर्धारण व कर संकलन अनुषंगीक कामे करणे.

**अटी व शर्ती :-**

१. सदर नियुक्ती ३ महिने अथवा जास्तीत जास्त ६ महिन्यांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
२. सेवानिवृत्त विक्री कर अधिकाऱ्यांचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.
३. सेवानिवृत्त विक्री कर अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
४. नियुक्त सेवानिवृत्त विक्री कर अधिकाऱ्यांस वसई विरार शहर महानगरपालिका येथे काम करावे लागेल.
५. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त विक्री कर अधिकारी आयुक्त तथा प्रशासक, आयुक्त व उप-आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना वेळोवळी केलेल्या कामकाजाचा अहवाल सादर करतील.
६. उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज सोबत जोडलेल्या नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलिखित करावा.
७. उमेदवाराने सदर पदाकरिता जाहिरातीच्या दिनांकापासुन आठ दिवसांच्या आत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार, विरार (पुर्व), ता.वसई, जि.पालघर -४०१३०५ या पत्त्यावर पोहोंचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना www.vvcmc.in या महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(अजिंक्य बगाडे)
अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

प/४

# अर्जाचा नमुना

वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय विरार येथे स्थानिक संस्था कर विभागामध्ये स्थानिक संस्था कर व कर निर्धारक व कर संकलक संवर्गातील सेवानिवृत्त विक्री कर अधिकारी श्रेणी-अ अधिकाऱ्यांमधुन करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत.

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडच्या काळातील स्वत:चे छायाचित्र येथे लावावे. |

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :-

४. भ्रमणध्वनी क्रमांक :-

५. जन्म दिनांक व वय :-

६. शैक्षणिक अर्हता :-

७. अनुभव :-

उपरोक्त पदावर करार पद्धतीने नियुक्तीबाबत जाहिरात / सुचना मी काळजीपुर्वक वाचली असुन, सदर सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी